पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/ १३ /कावि/ ७८/२०१७
दिनांक- २०/ ०५ /२०१७

**विषय:- महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ:- १) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/१६/२०१६, दि. १३/०१/२०१६
२) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/७७/२०१६, दि. ०१/०४/२०१६
३) परिपत्रक क्र. मातंवि/०८/कावि/३६९ /२०१७, दि.१०/०२/२०१७
४) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/४७/२०१६, दि. १७/०४/२०१७

## परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर विविध विभागांशी संबंधित माहिती प्रसिद्ध करणेत येते. सदरची माहिती प्रत्येक विभागाने वेळोवेळी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्यासअनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र. १,२,३ व ४ अन्वये विविध विभागांशी संबंधित माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर अद्ययावत ठेवणेबाबत कळविणेत आलेले आहे.

तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, अद्याप काही विभाग सदरची माहिती तसेच माहितीतील झालेले बदल संकेतस्थळावर वेळचेवेळी प्रसिद्ध करीत नाहीत. याबाबत विशेषकरुन विविध कामांचे दिलेले आदेश वेळचेवेळी प्रसिध्द केले जात नसल्याची तक्रार मा. नगरसेविका सौ अश्विनी चिंचवडे-पाटील यांचेकडुन पत्राद्वारे तसेच महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोटर्लवर **online** प्राप्त झाली आहे.

तरी आपले विभागाद्वारे देण्यात आलेले कामाचे आदेश करारनाम्यासहित त्वरीत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच विभागाने दिलेले आदेशाबरोबरच विभागाशी संबंधित इतर माहितीही (उदा. परिपत्रके, विविध कामांचे दिलेले आदेश, करारनामे, नागरिकांची सनद, विविध योजना, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, **RTI** अंतर्गत प्रसिद्ध करावयाची माहिती--१७ मॅन्युअल्स, ६०अ अंतर्गत सार्वजनिक प्रकटीकरण माहिती इ.) वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत दक्षता घेणेत यावी. याबाबत यापुर्वीच सर्व संबंधित विभागांना त्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व अद्ययावत करणेचे अधिकार (**Login ID** व **Password)** देणेत आलेले आहेत. तरी उपरोक्त माहिती प्रसिद्ध करणेबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झालेस माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वेबसाईटवरील माहिती मुदतीत प्रसिद्ध / अद्ययावत झाली नाही तर त्यास संबंधीत विभागप्रमुख जबाबदार राहतील व यानंतर संकेतस्थळावर माहिती अद्ययावत नसलेबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास विभाग प्रमुखास जबाबदार धरणेत येऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.